# A.V.E.SOCIETYS
# DEGLOOR COLLEGEDEGLOOR
# DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
# B.A. THIRD YEAR



प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव
विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागप्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड ४३१७१७
इमेल : ratnakarlakshete1@gmail.com
Mobile No.: 9423439276

# बी.ए.तृतीय वर्ष
# राजकीय विचारप्रणाली

## DILECTICAL MATERIALISM
## द्वंद्वात्मक भौतिकवाद

- प्रास्ताविक
- द्वंद्वात्मक भौतिकवाद मार्क्सवादाचे एक तत्व आहे.
- द्वंद्वात्मक भौतिकवादाला विरोध विकासवाद, द्वंद्वात्मक वस्तुवाद असेही म्हणतात.
- द्वंद्वात्मक भौतिकवाद कार्ल मार्क्सच्या संपूर्ण विचाराचा मूळआधार आहे.
- कपिटल आणि होली फमिली या ग्रंथात मार्क्सने हा सिद्धांत मांडला
- एंजिल्सने त्याच्या अटी दुहरिंग या ग्रंथामध्ये या सिद्धांताचा विस्तार केला.
- द्वंद्ववाद व भौतिकवाद या दोन संकल्पनेवर हा सिद्धांत आधारलेला आहे.
- रशियन विचारवंत वि.अफवास्टोव च्या मते –मार्क्सने द्वंद्ववादाचा विचार हेगेल कडून व भौतीकवादाचा विचार फायरबाख कडून घेतला आहे.

# DILECTICAL MATERIALISM द्वंद्वात्मक भौतिकवादचा अर्थ

- द्वंद्वात्मक भौतिकवादचा अर्थ खालीलप्रमाणे समजून घेता येतो.
- द्वंद्ववाद –
- द्वंद्वात्मक या शब्दाला इंग्रजीमध्ये DILECTICAL असे म्हणतात .
- DILECTICAL हा शब्द ग्रीक भाषेतील डायलेगो /डायलाग या शब्दापासून बनला.
- याचा अर्थ वाद-विवाद ,तर्क-वितर्क असा होतो.
- मार्क्सने द्वंद्वात्मक पद्धतीचा विचार हेगेल कडून त्यामुळे हेगेलचे द्वंद्वात्मक विचार प्रथम जाणून घ्यावे लागतील.
- **हेगेलचे द्वंद्वात्मक विचार**
- प्राचीन काळात सोफिस्ट व ग्रीक विचारवंतानी हा विचार मांडला.
- सोक्रीटीसच्या संवादात वाद-विवाद दिसून येतो .
- एखाद्या विचारवंताने मांडलेले मत खंडित करने होय .
- प्लेटो –द्वंद्व म्हणजे एखादी व्याख्या निश्चित करण्यासाठी नाट्यमय वैचारिक संघर्षाची वैचारिक प्रक्रिया होय. परंतु
- हेगेलने अरीस्टोटल च्या राज्याच्या चक्राकार सिद्धांताप्रमाणे द्वंद्वात्मक पद्धतीचा विचार केला .

- प्राचीन ग्रीक विचारात द्वंद्वाची प्रक्रिया दोन चरणात होती
- उदा.राजेशाहीचा-प्रतिवाद हुकुमशाही –परंतु
- हेगेलच्या मते प्राचीन ग्रीक विचारात द्वंद्वाची प्रक्रिया तीन चरणात होती – अस्तित्व –नाश –पुनअस्र्तित्व यालाच
- हेगेल –
- वाद (Thesis )
- प्रतिवाद (Anti Thesis)
- संवाद (Synthesis) म्हणतो
- मानवाचा विकास सरळ मार्गाने झाला नसून वाकड्या तिकड्या मार्गांनी झाला आहे.
- द्वंद्वाचा आधारे विश्वातील विचार विकसित होतात.
- विचाराच्या विकासाचा एक क्रम असतो.
- प्रथम एक विचार अस्तित्वात येतो.-वाद (Thesis )
- कांही काळानंतर त्यातून दुसऱ्या विचाराची निर्मिती होते. प्रतिवाद
- यात संघर्ष /द्वंद्व होवून एका नव्या म्हणजेच तिसऱ्या विचाराची निर्मिती होते. संवाद (Synthesis)
- ही विचाराची /विकासाची प्रक्रिया सतत सुरूच राहते
- लेनिनच्या मते – द्वंद्वात्मकतेचा खरा अर्थ विरोधी विचारांचा अभ्यास होय.
- अंड्यात असणारा मूळ जीव म्हणजे वाद होय अंड्यातून जीव बाहेर पडणे प्रतिवाद होय .
- बाहेर पडलेला जीव परत अंडे देतो व त्यातून अनेक जीवांची निर्मिती होते म्हणजे हा संवाद होय

# भौतिकवाद/वस्तुवाद

- विश्वामध्ये जे अस्तित्वात आहे ,वास्तवात आहे त्यास भौतिकवाद म्हणतात
- कार्ल मार्क्स ने हा विचार जर्मन विचारवंत फायरबाख यांच्याकडून घेतला
- फायरबाख हा विज्ञाननिष्ठ भौतीकवादाचा जनक आहे.
- फायरबाख यांनी १९ व्या शतकात हेगेलच्या चिदवादी तत्वज्ञानाच्या विरोधात हा विचार मांडला.
- ग्रीक विचारवंत पारमेनीडस व आयोनिअन्स हे आद्य भौतिकवादी विचारवंत म्हणून ओळखले जातात.
- ग्रीक विचारवंत डेमोक्रीटस व एपीक्यूरस यांच्या विचारातही भौतीकवादाचा विचार आहे.
- गलिलीयो व न्यूटन यांच्या विचारातही भौतीकवादाचे विश्लेषण आहे.

# हेगेल व मार्क्सच्या द्‌वंद्‌ववादातील फरक

| हेगेल | कार्ल मार्क्स |
|---|---|
| हेगेल हा आदर्शवादी विचारवंत आहे.विचार किंवा अध्यात्मवाद हा त्याच्या द्‌वंद्‌ववादाचा मुख्य आधार आहे. | कार्ल मार्क्सच्या द्‌वंद्‌ववादाचा मुख्य आधार भौतिकवाद/वस्तुवाद आहे. |
| मानवी मनात प्रथम आदर्शतत्व जन्मास येते व त्याचा व्यवहार्य अविष्कार नंतर भौतिक वास्तववादी जगात होतो. | आपल्या भोवतीच्या भौतिक जगात प्रथम बदल घडतो व नंतर त्याच्या अवलोकनाने नव्या संकल्पना व विचार आपणास सुचतो |
| निसर्गाच्या सर्व परिवर्तनाचे प्रमुख कारण आत्म्याची शक्ती मानतो.<br><br>सृष्टी मध्ये होणाऱ्या सर्व परिवर्तनाचे कारण विचार आहे. | निसर्गाच्या सर्व परिवर्तनाचे प्रमुख कारण उत्पादनाचे साधन मानतो.<br><br>सृष्टी मध्ये होणाऱ्या सर्व परिवर्तनाचे कारण आर्थिक आहे. |

# कार्ल मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

- भौतिक तत्व किंवा पदार्थ हेच विश्वाचा आधार आहेत.
- या सिद्धांतावरच इतिहासाची म्बौतिक मीमांसा मार्क्स ने केली आहे.
- जगामध्ये जे परिवर्तन होत असते त्याचे कारण दैवी सत्ता नसून भौतिक म्हणजेच आर्थिक परिस्थितीच आहे.
- गव्हाचे बी वाद होय.
- हे बी जमिनीत पेरल्यानंतर त्याचे अंकुरात रुपांतर होवून वाढ होणे म्हणजे प्रतिवाद होय.
- ते गव्हाचे वाढलेले रोप नष्ट होवून नवीन गव्हाचे अनेक बिया निर्माण होणे हे संवाद होय.

# द्वंद्वात्मकभौतिकवादाची तत्वे

- विकास हा द्वंद्वात्मक प्रक्रियेने होत असतो.
- मात्रात्मक फरकामुळे गुणात्मक फरक असतो.पाण्याचे बर्फात होणारे परिवर्तन गुणात्मक असते.
- विश्वातील वास्तूमध्ये तत्वाची एकता असते.
- एक वस्तू दुसऱ्या वस्तूशी संबंधित असून परस्परावलंबी असते.
- वस्तुत अंतर्विरोध असतो.
- जन्म मृत्यू  पुनर्निर्माण अशी प्रक्रिया आहे.
- माणूस मरणाची बीजे घेवून जन्मास येतो व संतांरुपणे विकसित होतो.

# कार्ल मार्क्सच्या दवंद्वात्मकभौतिकवादाची वैशिष्ट्ये

- क्रांतिकारी प्रक्रिया
- संख्यात्मक व गुणात्मक परिवर्तन
- भौतिक जगाचा विचार
- परिवर्तनशीलता
- पदार्थामुळे बुद्धीचा विकास होतो.
- विकास सरळ रेषेत होत नाही.

# द्वंद्वात्मकभौतिकवादाचे दोष/टीका

- अस्पष्टता
- विसंगत विचार
- समजण्यास अवघड
- आत्म तत्वाची उपेक्षा
- केवळ द्वंद्ववादावर भर
- दृष्टान्तावर भर
- मानवी इतिहास विकास व ऱ्हासाचा आहे.
- भौतिकवादावर अनावश्यक भर

# द्वंद्वात्मकभौतिकवादाचे महत्व

- धर्मनिरपेक्षतेचे समर्थन करतो
- गुणात्मक परिवर्तनावर भर देतो.
- समाजवादी मार्गाच्या विकासाला पुष्टी देतो.

# कार्ल मार्क्स







लेनिन



स्टॅलिन